Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – X Issue – III May – June 2021

# मानसशास्त्रीय व्यक्तीमत्व मापन, साहित्य व पद्धतीचा अभ्यास

**संशोधिका**

**श्रीमती सिंधू विश्वंभर झोडपे**

विद्यार्थीनी पीएच.डी. (शिक्षणशास्त्र) प्रवेशित

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

औरंगाबाद.

**व्यक्तिमापन :**

**साहित्य व पध्दती :**

समग्र व्यक्तिमत्त्व मापन पध्दतीत अनेक चांगल्या, वर्तन, निरीक्षणे, मुलाखती इत्यादी बाबींचा समावेश होतो. दुसऱ्या महायुध्दात या पध्दतीचा मोठ्या प्रमाणावर चाचणी घेण्याच्या दृष्टीने सर्वप्रथम जर्मनी नंतर ब्रिटन या राष्ट्रात वापर करण्यात आला. प्रामुख्याने सैन्यातील महत्त्वाच्या आणि डावपेचातील जागासाठी योग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी या पध्दती निर्माण करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे त्या ठिकाणी योग्य व्यक्तीची निवड होऊन काम चांगले पाडण्यासाठी याचा उपयोग होत आहे.

CC BY Golbal Oline Electronic International Reserch Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**१) ओ.एस.एस. चाचण्या :**

सर्वसाधारणपणे या चाण्यांचा वापर प्रथम अमेरिकेत करण्यात आला. या चाचणीद्वारे सैन्यातील महत्त्वाच्या जागी आपली निवड व्हावी अशी इच्छुज्ञ असलेल्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाचे मापन केले जात असे या चाचणीतून व्यक्तीच्या अंगी असणारे विविध गुण, अभिवृत्ती, आदर्श, त्याची जीवनमूल्ये यांच्या दृष्टिकोनातून त्याचे निरीक्षण केले जाते.

व्यक्तींना यासाठी लेखी चाचण्या आणि प्रश्नावली सारख्या चाचण्या दिल्या जात असे. तसेच त्यांच्यामुळे व्यक्तीच्या जीवन चरित्राची माहिती मिळण्यास मदत होते. तसेच त्यांच्या अंगी असणाऱ्या विविध क्षमता, त्यात समयसुचकता, प्रसंगावधान, नेतृत्त्व, सहकार्यवृत्ती, चुका स्वीकारण्याची वृत्ती, योग्य सुचनांचा आदर करण्याची वृत्ती इत्यादी बाबींचे निरीक्षण या चाचण्यांद्वारे केले जाते.

**२) व्यक्तिमापन प्रेक्षपण चाचण्या :**

व्यक्तिमत्त्वाचे अबोध स्वरूप जाणून घेण्यासाठी या प्रेक्षपण चाचण्यांचा वापर केला जातो. त्यात प्रक्षेपण म्हणजे व्यक्तीच्या मनातील संकल्पना, विचार, भावना यांचा अप्रत्यक्षरित्या केलेला अविष्कार होय. यात प्रतिसादकाच्या प्रक्षेपणाचा अन्वयाचे विश्लेषण पध्दतीने करून व्यक्तिमत्त्वाचे मापन केले जाते.

प्रक्षेपणतंत्रात प्रामुख्याने शाईची ठिपके, चित्रे, मातीची नमुने, बाहुल्यांचा खेळ, इ. प्रकारची साधने व चाचण्यांचा वापर केला जातो.

**३) रोर्शा चाचणी :**

हरमन रोर्शा या स्वीस मानसशास्त्रज्ञाने १९२१ मध्ये ही चाचणी तयार केली. या चाचणीमध्ये त्याने १० कार्डचा वापर केला असून कार्डवर शाईच्या डांगांनी आकृत्या तयार केलेल्या असतात. त्यातील पाच कार्डवर कृष्णधवल रंगाच्या आकृत्या आणि उरलेल्या पाच कार्डवर रंगीत आकृत्या प्रकाशित केलेल्या असतात.

प्रत्यक्ष चाचणी देण्यापूर्वी शिक्षक प्रतिसादकांशी घनिष्ट संबंध प्रस्थापित करतो आणि चाचणी वेळी शिक्षक प्रतिसादकाला एका वेळी एक कार्ड देतो आणि त्यावरील साईचा डाग कसा दिसतो, आकृती कशी वाटते, आकृतीतून काय दर्शविले जाते. त्यावरून त्याचा अन्वयार्थ लावून व्यक्तिमत्त्व मापन केले जाते.

**४) TAT चाचणी :**

प्रक्षेपण तंत्रातील ही एक लोकप्रिय कसोटी आहे. ही कसोओी मॉर्गन मरे यांनी १९३५ मध्ये प्रथम तयार केली आहे. यात प्रतिसादक आपल्या वैयक्तिक जीवनातील घडामोडीच्या आधारे सामुग्रीची रचना करतो आणि ती सामुग्री चित्रातील व्यक्तीच्या माध्यमातून प्रक्षेपित करतो हे या कसोटीचे गृहीतक मांडण्यात आले आहे. या कसोटीत एकूण ३० चित्रांचा समावेश केला जातो. त्यात १० चित्रे ही स्त्री आणि पुरुषाची चित्रे दिली जाते. प्रत्येक चित्रात जीवन प्रसंग रेखाटलेला असतो व तो संदिग्ध आणि अनिश्चित स्वरूपाचा असतो. क्ष्यामुळे प्रतिसादक स्वैर कल्पना करतो.

**५) कॅट चाचणी :**

बेलॉक यांनी १९४८ मध्ये ही कसोटी शोधून काढली. या कसोटीचा वापर ३ ते १० वर्षापर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व मापनासाठी वापरली जाते. या कसोटीत कार्डवर प्राण्यांची चित्रे असतात. ती पाहुन मुलाने गोष्ट सांगायची असते. त्या गोष्टीचे टॅट चाचणी मधील प्रतिसादकाच्या विश्लेषणानुसार अन्वयार्थ काढला जातो. या कसोटीतून भावंडातील स्पर्धा, पोषण समस्या, बाल्यावस्थेतील संघर्ष याबाबतची माहिती मिळण्यास मदत होते.

**६) शाब्दिक सहचार्य कसोटी :**

या प्रेक्षपण तंत्रामध्ये प्रतिसादकाने चेतक शब्द ऐकल्यानंतर मनात येणारा पहिला शब्द सांगायचा असतो. चेतकाने शब्दाची निवड संघर्षपूर्ण क्षेत्राच्या आधारे केलेली असते. उदा. कुटुंब, शाळा, समाज, मित्र इ. प्रतिसादकाच्या प्रतिसादकाचे मूल्यमापन हे प्रतिसाद देण्यास लागणारा वेळ आणि प्रतिसादाचा शब्द यांच्या आधारे केले जाते. या दोन निकषासोबतच प्रतिसादकाने दिलेला भावनिक प्रतिसादही लक्षात घेतला जातो. उदा. चेतक शब्द ऐकल्यावर हसणे, गोंधळणे, चेहऱ्यावर नाराजीचे भाव दिसते.

**७) वाक्यपूर्तता कसोटी :**

श्मुक यांनी १९६३ मध्ये वाक्याची पूर्तता करण्याची कसोटीचा शोध लावला आहे. या कसोटीत काही अपूर्ण वाक्य दिली जातात. परीक्षार्थ्यांनी ही वाचून नंतर ती पूर्ण करायची असतात. उदा. भावना, आवड, नावड यांचा पडताळा घेण्यासाठी खालील वाक्य असतात.

१) मला राग येतो जेव्हा --------

२) --------------- याबाबतीत मी स्वार्थी आहे.

३) मला तिटकारा आणणारी बाब म्हणजे ----------

श्मुक यांनी शाळाबाबतच्या भावना जाणून घेण्यासाठी खालील वाक्ये दिली आहेत.

१) माझी शाळा म्हणजे ---------

२) अभ्यास करणे म्हणजे -------------

या कसोटीचा वापर करणे सोपे असते. पण त्याच्या मर्यादा आहेत. ही कसोटी केवळ लिहिता वाचता येणाऱ्या व्यक्तीसाठी वापरता येते. आपण काय आणि कोणत्या प्रकारचा प्रतिसाद देतो हे प्रतिसादकांना माहिती असते. त्यामुळे ते जाणीवपूर्वक काही भावना लपवू शकतात आणि चांगला प्रतिसाद देऊ शकतात. त्यामुळे व्यक्तिमत्त्व मापनाची विश्वासर्हता कमी होते.

**संदर्भ :**

१. दांडेकर वा. ना. (२००७), "शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र", पुणे : विद्या प्रकाशन, पृ.क्र. २२४-२३०.

२. प्रा. मीना आहेर, प्रा. संभाजी सोनवणे (सप्टेंबर २०११), प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, पृ.क्र. १३३.१३५